मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
४५१२

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय: बा०वा०
दा. क्र. ४५१२

BVBK-0404512


लोक शिक्षण माला

# आपण कसे वागतो ?

अनुक्रम
क्रांक
नों. दि.

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. श्री.
दा. क्र. ४५९२.

भाग २ रा



BVBK-0404512

बोहरी—'आवो बिस्मिल्ला !' ............पान ६

—बा. ग. जगताप

लोक शिक्षण माला

★

# आपण कसे वागतो ?

भाग २

अनुक्रम
विभाग
क्र.
नों. दि.

●

लेखक

बा. ग. जगताप

पुणें

किंमत ७ आणे

प्रकाशक
सौ. उज्वला वसंत देसाई
बी. ए., बी. टी.
१३७४/२१ शुक्रवार, पुणें. २.

२०००।९।५३

मुद्रक
मा. र. कारले
जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार, पुणें २.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

आज आपणास समाज सुधारावयाचा आहे. व्यक्ति सुधारल्याशिवाय समाज सुधारला जात नाही. लहान मोठा, स्त्री पुरुष, खालचा वरचा, हा कसलाच भेद राहता उपयोगी नाही. सर्वांनी आपली वागणूक सुधारली पाहिजे. आपले सुख आपल्या वागणुकीवर अवलंबून आहे. आपले चुकत असले तरी, वागणुकीचे काही चांगले नमुने आपल्याच समाजात आपणास पाहावयास सापडतात. एकमेकापासून चांगले शिकण्याचा आपण प्रयत्न केला, तर समाज किती तरी पुढे जाईल.

‘ आपण कसे वागतो ’ या विषयावर काही गोष्टी लिहिण्याची सुरवात ‘ लोकशिक्षण ’ मासिकात आम्ही केली. दहा गोष्टींचे एक पुस्तक, मार्च १९५१ साली आम्ही प्रसिद्ध केले. आणखी दहा गोष्टींचा दुसरा भाग आज रोजी आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. या गोष्टी आपण काळजीपूर्वक वाचा व आपल्या मुलाबाळाना व शेजाऱ्याना सांगा. सर्वांच्या पुढे एकच ध्येय आहे. आणि ते म्हणजे राष्ट्राची पातळी वर आणावयाची हे. हे कार्य आपल्या सर्वांचे सहकार्याने पार पडो, हीच अपेक्षा !

पुणें<br>सप्टेंबर १९५३ } बा. ग. जगताप


अनुक्रमणिका

# आपण कसे वागतो ?

## भाग २


| विषय | पान |
|---|---|
| १. आगगाडीचा प्रवास | ५ |
| २. सदोबाची यात्रा | ८ |
| ३. खोटे भेद | ११ |
| ४. वाइटाचा तिटकारा | १४ |
| ५. जिवंतपणी गोडवा | १६ |
| ६. सोंग नीट झाले पाहिजे | १८ |
| ७. वाइटाचा प्रतिकार | २२ |
| ८. टापटिपीचा संसार | २४ |
| ९. नुसते बघे होऊ नका | २८ |
| १०. आपल्यावरून जग ओळखा | ३० |

# १. आगगाडीचा प्रवास



मी एकदा आगगाडीने प्रवास करीत होतो. प्रवास लांबचा होता. बारा वाजण्याचा सुमार झाला. जो तो फराळाचे डबे सोडू लागला. आपल्या अन्नाकडे दुसऱ्याची नजर जाऊ नये, म्हणून दुसऱ्याकडे पाठ फिरवून, जो तो आपल्या पोटोबाची शांति करीत होता.

आमची जेवणे जवळ जवळ संपत आली. माझे

शेजारी एक मुसलमान बोहरी होता. तो शिया पंथीय होता. त्यालाही जेवावेसे वाटले. त्याचे शेजारी एक आंधळा मुसलमान भिकारी बसला होता. त्या बिचाऱ्या आंधळ्याला आपण कोणाच्या शेजारी बसलो आहोत, हे दिसत नव्हते.

त्या श्रीमंत बोहऱ्याला डोळे होते; म्हणजे त्याला दिसत होते, इतकेच नव्हे तर, त्याला धर्म समजत होता. कुराणाने सांगितलेला धर्म तो पाळीत होता. इस्लाम-धर्म सांगतो कीं 'भाकरी खावयास बसलास म्हणजे सर्वांना हाक मार.' त्या बोहऱ्याने 'आवो बिस्मिल्ला' म्हणून त्या आंधळ्याला जेवावयास बोलाविले. आंधळा 'नको, नको' म्हणत होता. अखेरीस त्या बोहऱ्याने त्या आंधळ्याचा हात धरून आपल्या फराळाच्या डब्यात घातला. आंधळ्याचा नाइलाज झाला. त्याने त्या बोहऱ्याबरोबर जेवण्यास सुरवात केली.

बोहरी श्रीमंत होता, भिकारी गरीब होता. परंतु दोघेही सख्ख्या भावासारखे एकाच ताटात जेवत

होते. आम्ही मंडळी जेवण आटोपून बसलो. एकमेकानी एकमेकाना विचारले नाही. एकाची चटणी दुसऱ्याला व दुसऱ्याचे लोणचे तिसऱ्याला पोहचले नाही. आमचा तुटकपणा व या दोघांचा प्रेमळपणा पाहून आमची आम्हाला लाज वाटली.

आम्ही आमची पोटे भरली; परंतु या मुसलमान बंधूनी आपली पोटेच भरली, असे नसून, त्यानी आपली अंतःकरणेही भरली. ' सह नौ भुनक्तु ' असे आम्ही तोंडाने खूप म्हणतो, परंतु धर्म कृतीत उतरत नाही. जो धर्म कृतीत उतरत नाही त्याला काय महत्त्व !

## २. सदोबाची यात्रा

आपण एकाच गावी राहिलो, बाहेर कोठे गेलो नाही, तर जगाची ओळख होत नाही. आपल्या विषयीही आपली चुकीची कल्पना होते. आपलाच गाव चांगला, आपलीच भाषा चांगली, आपलाच पोशाख चांगला असे आपणास वाटते. बेडकाला असे वाटते की, माझी विहीरच सगळ्यात मोठी. त्याला समुद्राची कल्पना नसते. समुद्रसुद्धा माझ्या विहिरीपेक्षा लहान असेल असे त्याला वाटते.

आपला अहंकार जावा यासाठी माणसानी प्रवास करावा, दुसरे देश पाहावेत, यात्रा कराव्यात, असे नेहमी थोर माणसे सांगतात.

आमच्या गावचे सदोबा पाटील फार श्रीमंत होते. त्याना वाटले आपले आता वय झाले. काशीयात्रा करून यावे. दोन मित्र बरोबर घेतले व ते काशीला गेले. पूर्वी काशीला जावयास काही महिने लागावयाचे. प्रवास त्रासाचा असावयाचा. काही माणसे प्रवासात आजारी पडावयाची व मरा-

वयाची. म्हातारी माणसेच काशीयात्रेला जावयाची. काशीयात्रा करून मनुष्य जिवंत परत आला म्हणजे तो पुण्यवंत समजला जात असे. तो परत आपल्या गावी आला म्हणजे लोक वाजत गाजत त्याची मिरवणूक काढीत, त्याचे गळ्यात हार घालीत व त्याच्या पाया पडत.

आज आगगाडीने काशीला दोन तीन दिवसात ज़ाता येते. वाटेत कसलाच त्रास नाही. सदोबाजवळ दोन पैसे असल्याने त्यांचा प्रवास सुखाचा झाला. आठ दहा दिवसानी ते आपल्या गावी परत आले. पूर्वीच्या रूढीप्रमाणे गावकऱ्यानी त्यांची मिरवणूक काढली, त्यांच्या गळ्यात हार पडले. गावातील लहानथोर त्यांच्या पाया पडू लागले. सदोबाला वाटले आपण मोठा विजय मिळविला. आपण आता सर्वापेक्षा पुण्यवान् झालो !

मिरवणूक आटोपली. सदोबा घरी आले. इतक्यात त्यांचे एक चुलतभाऊ त्यांचेकडे आले व त्यांचे तब्येतीची विचारपूस करू लागले. ते सदोबाच्या

पाया पडले नाहीत. सर्व लोक माझ्या पाया पडले व हा गृहस्थ माझ्या पाया पडत नाही, हे पाहून सदोबाला राग आला. हा राग त्यांचे भावाने ओळखला व ते सदोबाला म्हणाले :—

" सदुदादा, तुम्ही मुंडण केलं नाही वाटतं ? "

" केलं नाही कसं ! केलं की. मुंडण केलं, पिंड दिलं, सगळं काही केलं. "

" डोकीचे केस गंगेत टाकलेत, पण अहंकार सोडला नाहीत. तो बरोबर घेऊन आलात दादा. "

सदोबा विचारा खजील झाला. तो काय बोलणार ? अहंकार जावा म्हणून यात्रा करावयाची; पण सदोबा मात्र अहंकार घेऊन परत आले. त्यांची यात्रा निष्फळ झाली.

## ३. खोटे भेद



एक घर होते. त्याला तीन खिडक्या होत्या. तीन खिडक्यात तीन मुले उभी होती. सूर्य नुकताच उगवला होता. आपल्या अंगावर सूर्याची किरणे पडलेली पाहून, एक मुलगा म्हणाला, ' माझा सूर्य कसा छान आहे.' त्यावर दुसरा मुलगा म्हणाला, ' अरे, तुझ्या सूर्यापेक्षा माझा सूर्य चांगला आहे. ' तिसऱ्या खिडकीतील मुलाला हे बोलणे न आवडून

तो म्हणाला, ‘ तुमच्या दोघापेक्षाही माझा सूर्य चांगला आहे. ’

ही मुलांची बोलाचाली चालू होती. तिथेच एक म्हातारा मनुष्य उभा होता. मुलांचे भांडण ऐकून तो हसला. त्याने सर्वांना बाहेर यावयास सांगितले. मुले बाहेर आली.

मुलाना उद्देशून तो म्हणाला, ‘ मुलानो ! दाखवा पाहू तुमचा प्रत्येकाचा सूर्य.’ आपल्यापुढे तर एकच सूर्य आहे, हे पाहून मुले खजील झाली.

परवा माझ्या खोलीत माझे तीन चार मित्र जमले होते. कोणत्या हौदाचे पाणी चांगले, असा प्रश्न निघाला. एकजण म्हणाला, ‘ आमच्या हौदाचे पाणी चवदार आहे. ’ दुसरा म्हणाला, ‘ अहो ! तुमच्या हौदाचे पाणी मी प्यालो आहे. आमच्या हौदाचे पाणी सरस आहे.’ जो तो आपल्याच हौदाची तारीफ करू लागला. ‘ अहो ! कशाला भांडता. दोन्ही हौदाना कात्रजच्या तलावाचे पाणी

येते,' असे जेव्हा मी म्हणालो, तेव्हां त्यांचे भांडण संपले.

आपण सारेजण आपआपल्या घरात बसून भांडत असतो. आपलेच म्हणणे खरे असे प्रत्येकाला वाटते. माझाच देव खरा, दुसऱ्याचा खोटा, असा आपला आग्रह असतो. परंतु सर्वांचा परमेश्वर एक हे आपण मानीत नाही.

त्यामुळे नसत्या मारामाऱ्या, नसती भांडणे निर्माण होतात. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. आपला वेष वेगवेगळा असेल, आपली भाषा निराळी असेल, परंतु आपल्या नसानसांमधून तांबडेच रक्त वाहात असते, हे आपण विसरतो. परमेश्वर आपल्या सर्वांचा पिता आहे, हे ओळखून एकमेकांनी एकमेकांशी वागले पाहिजे.

## ४. वाइटाचा तिटकारा

एक शाळेची तालीम होती. मुले तेथे संध्याकाळी नियमाने व्यायाम करण्यास येत असत. एके दिवशी कोणी तरी शाळेच्या कुलपाला घाण लावून ठेवली. व्यायामाच्या वेळी मुले तालमीजवळ जमू लागली. कुलूप काढावे कसे हा पेच प्रत्येकाला पडला. घाण हाताला कोण लावून घेणार ?

थोड्या वेळाने गुरुजी आले. त्यानी मुलाना विचारले, 'का रे बाहेर ?' मुलानी गुरुजीना कारण सांगितले. गुरुजी दाराजवळ गेले व म्हणाले, 'मुलानो ! हे कोणी केले आपणास माहीत नाही. परंतु आता कुलूप न काढता असेच ठेवावयाचे काय ? ते आपल्याला काढलेच पाहिजे. घाणीचा तिटकारा करून कसे भागेल ?' इतके म्हणून त्यानी जवळ पडलेला एक कागद डाव्या हातात घेतला व त्या कागदाने कुलूप धरले. कुलपाची घाण अशा-रीतीने हाताला न लागता कागदाला लागली व उजव्या हातात किल्ली धरून ती त्या कुलपात

घालणार, तोंच सर्व विद्यार्थी ओरडले, ' गुरुजी, आता आम्ही काढतो.' परंतु हे मुले ओरडून सांग-तात, तोंवर गुरुजींनी कुलूप काढलेही होते. कुलूप नळाखाली ठेवले व आपला हात त्यांनी साबणाने स्वच्छ धुतला.

जगात घाण सर्वत्र पसरली. आहे. परंतु तिचा तिटकारा करून कसे भागेल! ती काढून योग्य ठिकाणी टाकली म्हणजे ती घाण रहात नाही. अंग-णात उंदीर मरून पडला आहे. त्याकडे नुसते पाहून कसे भागेल? तो जर उचलला नाही तर तो तेथेच कुजू लागेल व आपणासच जास्त त्रास सोसावा लागेल. यासाठी तो उचलून दूर उकिरड्यावर फेकला पाहिजे किंवा जमिनीत पुरून टाकला पाहिजे. म्हणजे अंगण तर साफ होईलच, परंतु मातीत घाण मिसळून त्याचे नामांकित खत होईल.

## ५. जिवंतपणी गोडवा

एक गाव होता. तेथे दादा पाटील या नावाचा शेतकरी रहात होता. दादा पाटील फार मेहनती. शेती करावी दादा पाटलानी. एक गवताची काडी देखील वाया घालवायची नाही, अशी त्याची शिस्त होती. जेथली वस्तु तेथे नीट ठेवलेली असावयाची. घर साफ, अंगण साफ, गुरांचा गोठा साफ, त्याला घाण अशी कधी आवडायची नाही.

दादा पाटलाला सदूभाऊ म्हणून एक मुलगा होता. मुलगा बापासारखाच मेहनती. दादा पाटलाचे वय झाले. सर्व कारभार त्याने मुलाकडे सोपवला. घरातल्या एका खोलीत त्याने आपली पथारी पसरली. देवदर्शन करावे, शेतावर एखादी चक्कर मारावी, नातवाबरोबर खेळावे व खोलीत विश्रांति घ्यावी.

त्याला दम्याचा विकार होता. माणसाला काहीना काही पिडा असतेच. कोणाला दमा तर कोणाला पोटदुखी. म्हातारा खंगत चालला.

सदूभाऊ कारभार नीट करू लागला. परंतु पैसा एकदम हाती आल्यामुळे तो पैसा उडवू लागला. बापाला हे आवडेना. पैसा मिळवायला काय श्रम लागतात, याची त्याला चांगली कल्पना होती. मधून मधून तो मुलाला उपदेश करी. कधी कधी रागावेही. सदूभाऊला ते आवडेना. तो बापाचा तिटकारा करू लागला. बापाच्या खोलीतही जाईना. बापाने प्रेमाने हाका माराव्यात-'अरे सदू, अरे सदू,' म्हणावे. पोराने मनात म्हणावे, ' उगीच म्हातारा ओरडतो. ' कधी कधी म्हाताऱ्यावर तो रागावे व ' पडा आता स्वस्थ ' म्हणे. म्हाताऱ्याला वाईट वाटे. ' बरं बाबा, आता माझे कशाला ऐकाल! माझ्या मरणाचीच वाट पाहात आहात तुम्ही. रामा ! आता ने बाबा मला ' अशी काकुळतीने तो देवाची प्रार्थना करी.

एके दिवशी दादा पाटील देवाचे घरी निघून गेले. वहिवाटीप्रमाणे सर्व रडारड झाली. पाटील मोठा मनुष्य. त्याचा गोतावळाही मोठा. सदुभाऊनी दिवसाचे सगळ्या गावाला मोठे जेवण दिले. मोठा

खर्च केला. बाप स्वर्गात गेला, तेथे तो सुखाने रहावा, त्याला कमी पडू नये, म्हणून ब्राह्मणाला भांडीकुंडी दिली. बापाला स्वर्गात दूध मिळावे म्हणून ब्राह्मणाला गायही दिली.

गावातले लोक कुजबुजू लागले, ‘ जिवंतपणी म्हाताऱ्याला सुख दिले नाही आणि आता स्वर्गाला गाय पाठवायची तयारी. काय उपयोग ! माणसानी जिवंतपणी गोडवा धरला पाहिजे. ’

## ६. सोंग नीट झाले पाहिजे

शाळेतील मुलानी नाटक बसविले. तुकारामाचे नाटक होते. नाटकात राजा होता. राणी होती. तुकाराम, तुकारामाची बायको व दोन मुले होती. मंबाजी, तुंबाजी व आणखी काही पात्रे होती.

नाटक सुरू होण्यापूर्वी सगळी पात्रे रंगवावी लागतात. त्याशिवाय सोंग नीट होत नाही. मुलानी सोंगासाठी लागणारे सामान जमा केले. शिवाजी

राजाकरिता पगडी (जिरे टोप), शिरपेच, लांब आंगरखा, पायजमा व तरवारही पैदा केली. राणी-करिता पैठणी, अंगावर घालण्याचे दागिने-नथ, कंठा गोठ-पाटल्या वगैरे मिळविले.

ज्यानी त्यानी आपल्याला लागणारे सामान गोळा केले. निरनिराळ्या प्रसंगाला लागणारे सामान गोळा केले. निरनिराळ्या प्रसंगाकरिता लागणारे सामान—सूप, टोपले, नारळ, शिळी भाकर, पीठ, विठोबाची मूर्ति वगैरे आणिले.

रंगण्याकरता दोन तास अगोदर मुले थिएटरमध्ये आली. ज्याचेकडे तुकारामाच्या बायकोचे, जिजाबाईचे, काम होते, त्याने अगोदर रंगण्यास सुरवात केली. लुगडे नेसल्यावर चांगले चांगले दागिने अंगावर घातले व आपला थाट तो आरशात पाहू लागला. ‘ सोंग तर छान झाले, आता असं काम करतो, की सगळ्यानी टाळ्याच दिल्या पाहिजेत. ’ असे मना-तल्या मनात तो म्हणू लागला. इकडे राणीचे काम करणारे पात्रही रंगले. लुगडे नेसल्यानंतर दागिने

घालावयास जातो तो एकही मोठा दागिना नाही. सगळे काही जिजाईने घातलेले. त्याने व्यवस्थापकाकडे तक्रार केली. सगळी मुले एकत्र झाली. एकमेकांची नटलेली सोंगे ती पाहू लागली. दागिने राणीसाहेबांचे अंगावर असावयाचे, ते जिजाईचे अंगावर पाहून, जो तो 'चुकले, चुकले,' म्हणू लागला. 'तुकारामाची बायको गरीब. तिच्या अंगावर दागिने कशाला ? दागिने घातले म्हणजे टाळ्या मिळत नाहीत. अगोदर सोंग नीट सजले पाहिजे, म्हणजे कामाला उठाव येतो.' जिजाईचे काम करणाऱ्या मुलास हे पटले. त्याने आपले दागिने काढून राणीला दिले. आता ती नाटकात शोभू लागली !

नाटकास सुरवात झाली. सर्व मुलानी मनापासून कामे केली. काही काही कामे फारच चांगली झाली. खेळाचे शेवटी बक्षिसे वाटावयाची होती. जिजाईचे काम चांगले वठले, तिला पहिले बक्षीस मिळाले. तुंबाजीला दुसरे बक्षीस मिळाले. राजा राणी खूप सजली होती, परंतु त्यांची कामे बेताचीच झाली. त्याना बक्षिसे मिळाली नाहीत.

शेक्सपिअर म्हणून एक इंग्रज नाटककार होऊन गेला. तो म्हणत असे 'नाटकात जशी पात्रे काम करतात, तशी आपण माणसे या जगात कामे करीत असतो.' नाटकात आपले काम कोणते आहे, ते पाहून प्रत्येकाने आपले सोंग नीट वठविले पाहिजे. नाटकात जशी सर्व पात्रांची कामे महत्त्वाची आहेत, तशी या प्रपंचातील तुमची आमची सगळी कामे महत्त्वाची आहेत. सर्वांची कामे चांगली झाली तर 'नाटक चांगले झाले,' असे लोक म्हणतील. राणीचे दागिने आपल्या अंगावर घालण्यात जिजाईची जशी चूक झाली, तशीच आपल्यापैकी बहुतेकांची चूक होते.

ज्याने त्याने आपले काम समजून करावे. कोणतेही काम वाईट नाही. ज्याचे काम चांगले होईल त्यालाच शेवटी बक्षीस मिळते.

# ७. वाइटाचा प्रतिकार



एकदा एक मस्त कालवड शेतात शिरली व इकडून तिकडे व तिकडून इकडे उड्या मारू लागली. मुलानी तिला हुसकण्याचा प्रयत्न केला, परंतु ती काही बाहेर येईना. अखेर दोघा मुलानी दोन घोडी घेतली, त्यावर ते स्वार झाले व त्या कालवडीच्या मागे लागले. त्याना असे वाटले की, आता ती आम्हा घोडेस्वारापुढे किती धावणार ! शेतात गळ्या-

इतका जोंधळा उगवला होता. ती पळे पळे व एक-दम वळण घेऊन झुकांडी देई. असे बराच वेळ चालले. मुलांचा धुमाकूळ व आरडा ओरडा कमी होईना.

शेवटी शेताचा मालक, पाटील, घराबाहेर आला व ओरडून म्हणाला, ' अरे पोरानो ! कायरे चाललं आहे. सगळा जोंधळा मोडून टाकला. कालवडीच्या पायाखाली जोंधळा तुडवला गेला असता, पण आता घोड्याच्या पायाखाली तो कितीतरी नासला जात आहे ! ती मस्त कालवड अशी ऐकणार नाही. चला, शेताबाहेर तुम्ही अगोदर या पाहू ! '

अशा रीतीने ते दोघे घोडेस्वार बाहेर आले. आपण एवढे शूर व आपली घोडीही चलाख, परंतु त्याचा कांही उपयोग झाला नाही, हे पाहून ते खजील झाले. घोडी बाहेर असल्यामुळे ती काल-वडही आता स्थिर झाली. बरीच दमली होती बिचारी. नंतर पाटील जोंधळ्याजवळ जाऊन तिला हाक मारू लागला.

' ये भागे, ये; चल ये, ये. ' अशी चुचकारून

तिला हाक मारल्यावर ती कालवडही बाहेर आली.

वाइटाचा प्रतिकार करून ते नाहीसे करण्याचा आपण प्रयत्न करतो, परंतु पुष्कळ वेळा ते नाहीसे न होता उलट वाढत जाते. झाडाच्या फांद्या आपण तोडतो, परंतु त्यामुळे झाडाची वाढ न खुंटता ते वाढते.

आपण रागाने दुसऱ्याला एक शब्द बोलतो, परंतु तो दुसरा स्वस्थ न बसता दोन शब्द बोलतो. तुम्हीही मग अधिक रागाने बोलू लागता. अशा रीतीने शब्दाने शब्द वाढतो व जे टाळावयाचे ते टाळले न जाता उलट वाढते. हा अनुभव आपणास अनेक वेळा येतो. घाणीत दगड टाकावयाचा व घाण अंगावर उडवून घ्यावयाची, असाच हा प्रकार नाही काय ?

## ८. टापटिपीचा संसार

गंगूबाई आणि भीमाबाई शेजारी शेजारी रहात होत्या. दोघींच्या नवऱ्याना सारखा पगार होता.

दोघींना दोन दोन मुले होती. दोघीजणी बहिणी-सारख्या वागत असत.

गंगूबाईंचा संसार टापटिपीचा असे. तिने सकाळी उठावे. अंगण झाडावे. शेणसडा दारात घालावा. दूध आले की ते मुलाना द्यावे. स्वतासाठी व यजमानासाठी चहा करावा. थोडे दूध राखून ठेवावे, त्यातून कोणी पाहुणा आला तर त्याला चहा द्यावा. राहिलेले दूध विरजावे व भातासाठी दहीताक बनवावे, असा तिचा नेम असे.

भीमाबाईला मात्र हा टापटिपीचा संसार माहीत नसे. गंगूबाई शेजारी असून देखील ती तिच्या-पासून कांही शिकली नव्हती. गंगूबाई एक शेर दूध रोज विकत घेत असे. तर भीमाबाईही तितकेच घेत असे. चुलीवर दूध तापवण्यासाठी ठेवले की घरातून बाहेर व बाहेरून घरात, उगीचच ती ये जा करीत असे. दुधाकडे तिचे लक्ष नसावयाचे. रोज दूध उतू जावयाचे. ' अहो ! भीमाबाई, तुमचे दूध उतू गेले, ' असे कोणी तिला सांगितले तर

तिला ते आवडायचे नाही. भीमाबाईचे यजमानाकडे एखादा पाहुणा आला, तर बिचाऱ्याला चहा मिळे-लच असे कधी घडायचे नाही. दह्याची ताकाची गोष्ट तर दूरच !

गंगूबाई संसाराला लागणाऱ्या इतर जिनसा नीटनेटक्या ठेवीत असे. आठवड्यातून डब्यावर बसलेली धूळ झटकायची, काना-कोपरा झाडायचा, हा तिचा नियमच असे. भीमाबाईला नेहमी तूट पडायची. ‘ गंगूबाई, जरा तिखट घालता का ? जरा पीठ देता का ? ’ हे तिचे नेहमी चाललेले असायचे. आईबापांचा गैरशिस्तपणा मुलाना देखील भोवत असे. रोज आंघोळ घालून स्वच्छ धुतलेले कपडे बिचाऱ्या भीमाबाईच्या मुलाना क्वचितच मिळायचे.

एके दिवशी भीमाबाई गंगूबाईकडे गेल्या व म्हणाल्या, “ गंगूबाई ! तुमचं कसं बाई, अगदी ठाकठीक काम चाल्लं असतं. मला मेलं ते काय जमतच नाही. कसं हो करता हे सारं ? ”

"भीमाबाई, तुमच्या घरात जेवढा पैसा येतो, तेवढा आमच्याही घरात येतो, परंतु मी चिमूटभरही काही वाया घालवीत नाही. महिन्याला काय लागते ते एकदम खरेदी करते व ते महिनाभर पुरविते. एकादे थोडे कमी पडले तर त्याचीही फारशी पर्वा करीत नाही. आहे त्यातच भागविते. त्यामुळे मी कोणाकडे काही मागतही नाही. पगार आला की १० रुपये तरी बँकेत ठेवते. अहो ! उद्या आपल्या मुलांची लग्ने आहेत. आपले म्हातारपण आहे. आपले हात पाय थकले म्हणजे कोण आपल्याला मदत करणार ? मुले काय आपल्या बायका घेऊन दूर होतील. आज दिवस वाईट आहेत. संसार टापटिपीने केला तरच दिवस निघणार."

भीमाबाईला आता सारे पटले व आपली चूक कळून आली. प्रत्येक माणसाला आपला संसार टापटिपीने करता आला पाहिजे.

# १. नुसते बघे होऊ नका



एकदा आम्ही साताऱ्यास गेलो होतो. रस्त्याने जात असताना काही मुले धावत येताना दिसली. काही सायकल स्वारही मोठ्या घाईने सायकली पळवीत होते. जो तो विचारी ' काय झाले हो ? काय झाले हो ? ' परंतु कोणीही सांगेना. सहज कौतुकाने ज्या रस्त्याने ही धावपळ सुरू होती त्या रस्त्याने

१७८४२ अनु.

आम्हीही निघालो. थोड्याच वेळाने घरास आग लागली ' असे आम्हास समजले. पोहचवे म्हणून आम्ही तसेच पुढे गेलो.

एका घरातून धूर येताना आम्हास दिसला. घरातील माणसे बाहेर पडत होती. घरातील काही सामान बाहेर फेकून देण्यात येत होते. काही थोडी माणसे घराचे कौलावर चढली होती. काही बादल्यामधून व हंड्यामधून पाणी आणीत होती व घरावर चढलेल्या माणसाना ते पोचवीत होती.

दुसऱ्या बाजूला लोकांची खूप गर्दी जमली होती. ' अरे ! तो पाहा, दुसऱ्या बाजूने धूर निघू लागला. अरे ! आतल्या बाजूने जास्त पेटले वाटते. बाया माणसे तरी घराबाहेर निघाली की नाही, कोण जाणे ! अरेरे ! गरीबाचा संसार उघडा पडला ! ' मनात हळहळणारे बरेच होते; परंतु मदत करणारे फार थोडे होते. नळाना पाणी नव्हते. आजूबाजूच्या घरातून पाणी आणण्याचे काम पाच-सहा माणसे

करीत होती. काही आपला जीव धोक्यात घालून आग विझवीत होती.

आग विझविण्यास मदत करणारे पाच-पंचवीस, परंतु दुरून गंमत पाहणारे शेकडो होते. अशा बघ्यांचा काय उपयोग? नुसते अरेरे करून काय संकटाचे निवारण होणार? आपआपल्या घरचे एक एक बादली पाणी प्रत्येकाने आणले असते तर आग लवकर विझली असती.

यापुढे नुसते बघे राहून आपले भागणार नाही. दुसरा करतो आहे म्हणून स्वस्थ न बसता, धाडसाने जबाबदारी स्वीकारून कामास तयार झाले पाहिजे. नाहीतर एका गावात राहून आपला उपयोग काय?

## १०. आपल्यावरून जग ओळखा

शंकरराव साठे या नावाचे एक गृहस्थ सरकारी नोकर होते. त्यांचेकडे हिशेबाचे काम होते. दहा वर्षे ते हिशेबाचे काम करीत होते, परंतु त्यांचे

कामात नेहमी चुका व्हावयाच्या. वरिष्ठाकडून त्याना नेहमी बोलणी खावी लागत. शेवटी कंटाळून वरिष्ठानी त्याना आपल्या खोलीत बोलाविले व ' तुमचे काम समाधानकारक नाही, तरी तुम्हास पुढील महिन्यापासून कमी करण्यात येत आहे, ' अशी समज दिली.

शंकरराव गोरेमोरे झाले. त्यानी साहेबांचे पाय धरले. ' साहेब ! असं करू नका. माझ्या पोराबाळाकडे पाहा. माझ्यावर दया करा. आता पुन्हा माझ्या हातून चूक होणार नाही. '

साहेब दयाळू होते. त्यानी शंकररावाना एकवार क्षमा केली.

शंकरराव घरी गेले. आज आपणावर मोठे संकट आले होते, परंतु देवानेच आपणास निभावून नेले, असे त्याना वाटले.

आफिसातून शंकरराव घरी आले म्हणजे त्याना गरम गरम चहा मिळायचा. त्यांचे कुटुंब सगुणाबाई घरकामात दक्ष असत, परंतु त्यांचा आपला वेंधळा

४५१२-३२

कारभार असे. चहा त्या उत्तम करावयाच्या, परंतु चहात चहाची काळी पत्ती एकादे वेळी तरंगत असावयाची. अनेक वेळा शंकररावानी ' चहा नीट गाळून घेत जा ' म्हणून बायकोस ताकीद दिली, परंतु गडबडीत तिला काही ते नीट साधत नसे.

आज शंकररावापुढे चहा आला. त्यात ती काळी चहाची पत्ती तरंगताना दिसली. साहेबाविषयी राग मनात धुमसतच होता. तो बाहेर येण्याचा प्रयत्न करीत होता. अनायासे त्याला कारण सापडले. शंकररावांचा राग अनावर झाला. त्यानी बायकोला दोन शिव्या हासडल्या आणि तिने प्रेमाने व घाईघाईने आणलेला चहा लवंडून दिला. सगुणाबाई कष्टी झाल्या.

परमेश्वराने आपणावर दया करावी म्हणून आपण त्याचेपुढे सदैव हात जोडून प्रार्थना करतो, परंतु आपण मात्र दुसऱ्यावर दया करण्यांस तयार नसतो. ' परमेश्वराची दया तुला पाहिजे असेल, तर तूही इतरावर दया करण्यास अगोदर शीक ' असे संतानी मानवास सांगितले आहे, परंतु आपण तो उपदेश कोठे पाळतो ?

१५८७५